पुण्यनगरी

# 'शिवराज'च्या ३२ विद्यार्थ्यांना विद्यापीठाची शिष्यवृत्ती

**गडहिंग्लज :** येथील शिवराज महाविद्यालयाचे ३२ विद्यार्थी शिवाजी विद्यापीठाच्या २०२०-२१ या शैक्षणिक वर्षाच्या गुणवत्ता शिष्यवृत्तीचे मानकरी ठरले. मधुरा मटकर, ओमकार पाटील, वैभव लोखंडे, धनश्री कळसकर, ज्ञानेश्वरी खवरे, राहुल खवरे, नम्रता गिलबिले, स्वीटी बारदेस्कर, अनुराधा साबळे, साक्षी मिसाळ, मयुरी शिंदे, तेजस्विनी मगदूम, विराज पाटील, मानसी कमते या विद्यार्थ्यांना दहा हजार तर संयोगिता रावण, तृप्ती पाटील, संपत्ती पाटील, पवन गुंडप, अभिषेक सुतार, श्रृती आमनगी, दिव्या खांडेकर, ऐश्वर्या शिंदे, सीमा दोरुगडे, अपूर्वा पाटील, प्रेरणा सावंत, स्वाती चिंचेवाडी, सोनाली विभूते, माधव नाईक यांना पाच हजारांची शिष्यवृत्ती मिळाली.

तरुण भारत

# साहित्य वाचनाने होतोय सुप्त कल्पनांचा विकास



बिद्री : येथे दुधसाखर महाविद्यालयात बोलताना साहित्यिक किरण गुरव.

प्रतिनिधी
सरवडे

जीवन प्रगल्भ होण्यासाठी साहित्याचे वाचन गरजेचे आहे. त्यामुळे कल्पनेचा विकास होतो, वाचन हे लेखकाचे पोषणमूल्य आहे, त्यातून सकस साहित्याची निर्मिती होते, असे प्रतिपादन मराठीतील आघाडीचे लेखक किरण गुरव यांनी केले.

कागल तालुक्यातील बिद्री येथील दूधसाखर महाविद्यालयात मराठी विभागाने आयोजित केलेल्या 'माझी साहित्य निर्मिती प्रक्रिया" यावरील व्याख्यान व साहित्य अकादमी पुरस्कार मिळाल्याबद्दल सत्कारप्रसंगी ते प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते. अध्यक्षस्थानी प्रभारी प्राचार्य डॉ. संजय पाटील होते.

गुरव म्हणाले, सभोवतालचे सूक्ष्म निरीक्षण करून लेखन करावे. व्यंकटेश माडगूळकर, राजन गवस यांच्या साहित्य लेखनाचा आपल्यावर प्रभाव आहे. याबरोबर आपल्या गावकी या कथेची निर्मितीप्रक्रिया त्यांनी सांगितली.

डॉ. आनंद वारके यांनी स्वागत, प्रास्ताविक केले. नितीन कांबळे यांनी सूत्रसंचालन केले. ग्रंथपाल अतुल नगरकर यांनी आभार मानले. यावेळी डॉ. सी. वाय. जाधव, डॉ. एन. एम. पाटील, अर्जुन कांबळे, विध्यार्थी उपस्थित होते.